


बदक ओले का होत नाही?

लेखिका: ऑगस्टा गोल्डिन

चित्रे: लिओनार्ड केसलर

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन


बदक पाण्यात विहार करणारा पक्षी आहे.

दिवसभर ते पाण्याच्या आत-बाहेर करत असते.

ते कधी पाण्यात असते, तर कधी जमिनीवर असते.

पण कितीही वेळा पाण्यात गेले तरी बदक कधी ओले होत नाही.

बदक *जलरोधक (वॉटरप्रुफ)* असते.




बदक जलरोधक असते, कारण त्याच्या शेपटाजवळ एक तेलग्रंथी असते.

आपल्या रूंद चोचीने बदक ही तेलग्रंथी चाटते. हे तेल ते त्याच्या पिसांना आणि पंखांना माखते. याला *प्रीनिंग* असे म्हणतात.

अशा प्रकारे बदक तासनतास प्रिनींग करत बसते आणि आपल्या पंखांवर तेलाचा थर देते.

बदकाची पिसे ओली होत नाहीत, कारण तेल आणि पाणी एकमेकांत मिसळत नाहीत. पंखांवर लागलेले पाणी तेलाच्या थरामुळे घसरून खाली पडते.



तुम्ही स्वतः हे सिद्ध करू शकता.

आजुबाजूच्या परिसरातून काही पक्ष्यांची पिसे गोळा करा.

एखाद्या पिसावर पाणी शिंपडा. ते पीस ओले होईल, कारण बहुतांशी पक्ष्यांची पिसे जलरोधक नसतात.



तुमची बोटे खाद्यतेलात बुडवा. मग दुसरे एखादे पीस तुमच्या तेल लागलेल्या बोटांमधून फिरवा. असे दोन-तीन वेळा करा. आता त्या पिसावर तेलाचा थर लागलेला दिसेल.


आता तेलाचा थर लागलेल्या पिसावर पाणी शिंपडा. ते पीस ओले होणार नाही. कारण तेल आणि पाणी एकमेकांत मिसळत नाही.



तुम्हाला पक्ष्यांची पिसे मिळाली नाहीत तर हरकत नाही. तेल आणि पाणी एकमेकांत मिसळत नाहीत, हे दाखवण्यासाठी तुम्ही दुसरा एक प्रयोग करू शकता.

दोन कागदी पिशव्या घ्या. एका पिशवीवर खाद्यतेलाचा थर द्या. आता दोन्ही पिशव्यांवर पाणी शिंपडा.

तेलाचा थर असलेली पिशवी ओली होत नाही, कारण तेल आणि पाणी एकमेकांत मिसळत नाही.






अशाच प्रकारे, बदकाच्या पंखांवरही तेलाचा थर लागल्यामुळे पाणी पंखांच्या आत जाऊ शकत नाही.

बदके आपला बहुतांशी वेळ पाण्यात घालवतात.

ते डबक्यांमध्ये, तळ्यांमध्ये, दलदलींमध्ये आणि उथळ झऱ्यांमध्ये पाणी उडवत फिरत असतात. पाण्याने भरलेल्या खोल चरांमध्ये आणि खाडयांमध्ये ते जणू शीर्षासनच करतात. त्यावेळी त्यांचे डोके पाण्याखाली आणि शेपटाचा भाग हवेत असतो. पाहिलंय का कधी असे मजेदार दृश्य!








बदके अशा स्थितीत असतात, तेव्हा समजायचे की ते स्वत:साठी अन्न शोधत आहेत. पातळ त्वचेने जोडलेल्या बोटांनी पाणी वल्हवत ते वेगाने पाण्यात सूर मारतात आणि आपल्या रूंद चोचीने पाण्याच्या तळातील तण आणि गवत उपटून काढतात.

पिनटेल बदक आणि *मल्लार्ड* बदक पाण्यातील गवतामध्ये बियाणे आणि किटक शोधत असतात.

निळ्या पंखांचे बदक *(टील)* पाण्यात रानटी भातासोबत किटक, शिंपले आणि खेकडे शोधत असते.




शवलर बदक उथळ पाण्यात डुलत चालते. ही बदके चोचीने चिखल चिवडतात आणि त्यात बियाणे व सूक्ष्म पाणवनस्पती शोधतात. ते पाण्यातसुद्धा किटक आणि कोळंबी शोधतात.





जंगली बदके पाणवनस्पती शोधत असतात. ते पाण्याच्या पृष्ठभागावरचे हिरवे तण, गवताच्या बिया, रानटी भात, कमळाच्या बिया, ओक वृक्षाचे फळ आणि फळांचे गर खातात.




कित्येक बदके उत्तम पाणबुडे असतात.

काही बदके खूप खोल अशा तळ्याच्या तळाशीही जातात.

ते 100 फूट खाली जाऊ शकतात.

ही खोली दहा मजली इमारतीच्या उंचीइतकीच आहे.



बदके पाण्याखाली 300 फूट खोलवर पोहू शकतात.

श्वास घेण्यासाठी ते वर येतात, तेव्हा सुकून गेलेले असतात.


कॅन्व्हासबॅक आणि *स्कॉप्स* ही बदके रानटी ओवा, शिंपले आणि खेकड्यांसाठी पाण्याखाली डुबकी घेतात.




हार्लेक्विन बदके किटक आणि मासे यांच्यासाठी पाण्यात डुबकी घेतात.




*बफ्फेलहेड*सुद्धा!



मरगॅन्सर बदके मोठ्या माशांसाठी डुबकी घेतात. त्यांच्या चोचीत करवतीसारखे दात असतात. त्याच्या साहाय्याने, मरगॅन्सर बदक निसरडा *सामन* किंवा *ट्राऊट* मासा पकडते.






बदकांना त्यांचे अन्न पाण्यात किंवा तळ्याच्या, डबक्याच्या किनाऱ्यावर शोधावे लागते.

जेव्हा वातावरण थंड असते, तेव्हा नद्या आणि दलदल, तळी आणि तलाव बर्फाच्या थराने झाकली जातात.

जेव्हा पाणी गोठून बर्फ बनते, तेव्हा खेकडे, जमिनीवरचे आणि पाण्यातील तण आणि सारे मासे बर्फाच्या थराखाली असतात. त्यामुळे बदकांना हे अन्न मिळू शकत नाही.


अन्न मिळत नाही म्हणून बदके दूर उत्तरेकडे निघून जातात.
अन्न मिळू शकेल अशा दक्षिणेकडील खुल्या पाण्याकडे जातात..

दक्षिणेकडे उडणारी *डॅबलिंग* बदके




आणि *पिनटेल* बदके

आणि मल्लार्ड बदके



आणि *जंगली* बदके

टील आणि *शवलर* बदके



दक्षिणेकडे उडणारी *पाणबुडे* बदके

कॅन्व्हासबॅक आणि *स्कॉप्स* बदके


हार्लेक्विन आणि *बफ्फेलहेड बदके*



आणि मरगॅन्सर बदक

ही बदके ताशी 50, 60, 70 मैल, म्हणजे एखाद्या मोटारगाडीच्या वेगाने दक्षिणेकडे उडत जातात.



दक्षिणेकडील खुल्या पाण्यात बदकांना भरपूर अन्न मिळते. बदके तीव्र उन्हाळ्यात तसेच वादळांमध्येही उडत राहातात. ते वेगवान वाऱ्यांमध्ये आणि मुसळधार पावसातही उडत राहातात. पावसाचे सारे पाणी त्यांच्या पंखांवरून घसरून पडते.





बदके तुमच्या घरावरून उडत जात असतील तर तुम्हाला पुढच्या पानगळीमध्ये ते खात्रीने परतताना दिसतील. वर्षानुवर्षे बदके एकाच मार्गावरून उडत जातात. कधी कधी ते V आकार करून उडतात. त्यांचा नेता या V आकाराच्या टोकावर उडत असतो आणि इतर बदके त्याच्या पाठीमागे दोन तिरप्या रांगांमध्ये उडत असतात.




बदके खालून उडत जात असतील तर तुम्ही त्यांना स्पष्टपणे पाहू शकता. तुम्ही त्यांचा फुसफुस आवाज ऐकू शकता. तुम्हाला त्यांच्या तेलकट पंखांवरून वाहात जाणाऱ्या हवेचाही आवाज ऐकू येईल. तुम्ही कदाचित त्यांच्या शक्तिशाली पंखांची फडफडसुद्धा ऐकू शकता.

पण बदके उंचावरून उडत जात असतील तर तुम्ही त्यांचा आवाज ऐकू शकणार नाहीत. ते तुम्हाला स्पष्ट दिसूही शकणार नाहीत. आभाळात तुम्हाला फक्त V आकाराची एक धूसर आकृती दिसेल. बदके उडत जात आहेत, याचा तो एकमेव पुरावा असेल.

त्यावरून तुम्ही निष्कर्ष काढू शकता की बदके हिवाळ्यात दक्षिणेकडे स्थलांतर करत आहेत.








वसंत ऋतुचे आगमन झाल्यावर बदके परततील.

नद्यांमध्ये, तळ्यांमध्ये, डबक्यांमध्ये आणि दलदलीमध्ये डुबक्या घेण्यासाठी ते उत्तरेकडे उडू लागतील.

सकस अन्नाच्या शोधात ते पुन्हा खुल्या पाण्याकडे उडू लागतील.

उत्तरेकडे परतताना त्यांना वादळी वाऱ्यांमधून आणि पावसातून उडत यावे लागेल.

तरीही ते नेहमी सुकेच राहातील - कारण बदक कधी ओले होत नाही.


समाप्त